## <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3 रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400 614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-** **दिनांक 06/10/2015.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>नोव्हेंबर महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक 20 नोव्हेंबर 2015 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** इतिवृत्त

**2.** प्रश्नोत्तरे.

**3.** सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पातील तरतुदींचे पुर्नविनियोजन करणे.

**4.** नमुंमपाच्या महानगरपालिकेच्या अखत्यारीतील तलाव मत्स्य उत्पादनासाठी 05 वर्षाकरीता "परवानगी व अनुज्ञा" (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर देणे.

**5.** नेरुळ से. 19(अे) येथील वंडर्सपार्क मधील हिरवळीची जागा वापच्या शुल्काबाबत.

**6.** घणसोली विभागातील राबाडा शारकर आळी येथील जुने बैठी शौचालय तोडून नवीन तळ + 1 सार्वजनिक शौचालय बांधणे.

**7.** घणसोली प्रभाग क्र. 24 येथील रबाळे स्मशानभुमीची सुधारणा करणे.

**8.** नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांचे निवासस्थान वाटप व अनुज्ञाप्ती शुल्क आकारणीबाबत.

**9 व 10. श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**

**(9)** नमुंमपाच्या कार्यक्षेत्रातील वाशी, सेक्टर-10 मधील नवी मुंबई रुग्णालयालगतच्या भूखंडावर मर्ल्टीलेवर पार्किगची सुविधा करणे. **(10)** दिवसातून एक वेळा एक व्यक्ती मलविसर्जनाकरिता जात असेल तर त्याला 13 लीटर पाणी लागते आणि दिवसातून एक व्यक्ती 1 वेळा मुत्रविसर्जनासाठी गेला असता तरी 13 ली. पाणी लागते आणि दिवसातून कामीत कमी 4 ते 5 वेळा मुत्रविसर्जनसाठी जात असेल तर एकूण 65 लीटर पाणी लागते, त्यावर उपाययोजना म्हणून जलविसर्जन टाकी (Flash Tank) बदलण्याची सक्ती करणे

**11 ते 13. श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-**

**(11)** प्र. क्र. 82, जुईनगर, सेक्टर 25, येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयानामध्ये मध्यभागी डॉ. बाबासाहेबांची चांगल्या प्रकारची कलाकृती बनविणे. **(12)** प्र. क्र. 82, सेक्टर 24 मधील चिंचोली तलाव उदयानामध्ये बहुसंख्या लोक सकाळी व संध्याकाळी फिरण्यासाठी येतात. या सर्व लोकांची गैरसोय होत आहे, खास मिहिलांच्या व्यवस्थेसाठी शौचालयाची त्याचबरोबर अत्यावश्यक असणा-या पापोईची व्यवस्था करणे. **(13)** प्र. क्र. 82, सेक्टर 24 मधील चिंचोली तलावमध्ये विरंगुळा केंद्र उभारण्यात आले आहे. तेथील जेष्ठ नागरिकांची पाण्याची मोठी गैरसोय होत आहे, तरी तेथे पापोईची व्यवस्था करणे.

**14 ते 16. श्री. मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-**

**(14)** सफाई कामगार, ठोक मानधनावर काम करणारे शिक्षक व सर्व कंत्राटी कामगारांच्या वेतनामध्ये 4,000/- इतकी वाढ करणे. **(15)** नमुंमपाच्या सर्व नगरसेवकांना मनपा प्रशासनाने लॅपटॉप देण्यात यावा जेणेकरुन नगरसेवकांना पेपरलेस व्यवहार करता येईल. **(16)** नमुंमपाच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये व कोनशिलेवर सर्व सन्माननिय पक्षप्रतोदांची नांवे टाकणे.

**17. श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :-**

प्र. क्र. 11 मधील साईनाथवाडी व छत्रपती रहिवाशी कॉलनी येथे नवीन मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे.

**18 व 19. सौ. सलूजा संदीप सुतार, यांजकडून :-**

**(18)** प्र. क्र. 99, मधील सेक्टर 25 मधील श्री. राधाकृष्ण गार्डन चे सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. तसेच बरेच नागरिक, महिला, मुले गार्डनमध्ये येत असतात त्या ठिकाणी युवक व युवत्या गैरवर्तन करतात तसेच कुंपनाच्या सर्व लोखंड चोरीस गेलेले आहेत. म्हणूनच मजबूत सुरक्षा कुंपण बांधण्यात यावे, जेणेकरुन गार्डनचे नुकसान होणार नाही व गैरवर्तन कमी होईल, तसेच से. 25, मध्ये जेष्ठ नागरिक व महिलांसाठी जॉगिंग ट्रॅक बांधणे. **(19)** प्र. क्र. 99, मधील सेक्टर 23, मध्ये लहान मुलांसाठी तसेच तेथील नागरिकांसाठी जॉगिंग साठी खुले मैदान नाही. त्या नागरिकांना व मुलांना से. 25, से. 27 मध्ये यावे लागते. या सर्व बाबी लक्षात घेऊन से. 23, मधील भुखंड क्र. 181 हा सिडकोकडून 2005 साली नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाला आहे. तरी त्या ओपन स्पेस वरती से. 23, मधील नागरीकांसाठी व मुलांकरीता गार्डन तसेच जॉगिंग ट्रॅक बांधणे.

**20 व 21. श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-**

**(20)** प्र. क्र. 84 मधील स्मशान भुमी समोरील उघडा नाला बंदिस्त करणे. **(21)** प्र. क्र. 84 मधील राजीव गांधी ब्रिज खालील लावण्यात आलेल्या लाईटचा प्रकाश पडत नाही तरी त्या लाईटची दुरुस्ती करणे.

**22 ते 24. सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**

**(22)** प्र. क्र. 83, जुईनगर मध्ये सुरक्षेच्या कारणास्तव पोलिस स्टेशन साठी राखीव जागेवर लवकरात लवकर पोलिस स्टेशन बांधणे. **(23)** प्र. क्र. 83, जुईनगर येथे सुरक्षेच्या कारणास्तव मुख्य रस्त्यांवर CCTV कॅमेरे लावणे. **(24)** प्र. क्र. 83, जुईनगर ठिकठिकाणी जेष्ठ नागरिक जमा होऊन एक दुस-याशी चर्चा व सुख दु:च्या गोष्टी करत असतात त्याच्यासाठी प्रभागात ठिक ठिकाणी क½ बनवावेत जेणेकरुन त्यांना या ठिकाणी एकमेकांना भेटुन जगण्याचा आनंद घेता येईल.

**25 ते 27. सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**

**(25)** नमुंमपाच्या दैनंदिनीमध्ये इतर महानगरपालिकां प्रमाणे (उदा. कल्याण-डोंबिवली मनपा, पुणे मनपा पिंपरी चिंचवड) महानगरपालिकेसाठी वृत्तांकन करणा-या वृत्तप्रतिनिधीची नावे, वृत्तपत्राचे नाव, संपर्क क्रमांक व ई मेल आय.डी. यांची येणा-या दैनंदिनी 2016 मध्ये प्रकाशित करण्यात यावे. तसेच नवी मुंबई मनपा क्षेत्रातुन सातत्याने प्रकाशित होणा-या वृत्तपत्रांच्या माहितीचा प्राध्यान्याने उल्लेख करणे. **(26)** प्र. क्र. 101 मधील आग्रोळी गावामध्ये प्रवेश करणा-या मुख्य रस्त्यालगत प्रवेशव्दार (कमान) बनविणे. **(27)** कोकण भवन कार्यालयासमोरील पार्किग शेजारील उदयानासाठी आरक्षित असलेल्या से. 10 येथील भूखंड क्र. 13 व भूखंड क्र. 15ए या भुखंडावर उदयान विकसित करणे.

**28. श्री. दिपक रघुनाथ पवार, यांजकडून :-**

नमुंमपाच्या दैनदिन 2016 मध्ये महापालिकेसाठी वृत्तांकन करणा-या वृत्तप्रतिनिधीची अर्थात पत्रकारांचे नाव, संपर्क क्रमांक व ई मेल आय.डी. यांचा दैनंदिनी माहितीचा उल्लेख करण्यात यावा. (इतर महानगरपालिकांच्या दैनंदिनीमध्ये पत्रकारांची वर नमुद माहिती उल्लेखीत असते).

**29 ते 31. सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**

**(29)** प्र. क्र. 01 ईश्वरनगर येथील संपुर्ण प्रभागातील पालिकेच्या लाईट पोलवर एल. ई. डी. (LED) लाईट बसविणे. **(30)** प्र. क्र. 01 ईश्वरनगर येथील संपुर्ण प्रभागात सी.सी.टी.व्ही (CCTV) कॅमेरे बसविणे. **(31)** प्र. क्र. 01 ईश्वरनगर येथे मन्नूभाई चाळ ते दुर्गामाता प्लाझा पासून उत्तर भारतीय चाळी पर्यंत हेवी डयुटी गटार बांधणे.

**32 ते 34. सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**

**(32)** घणसोली रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेला असलेल्या माता मुक्कांबिका मंदिरालगतच्या नैसर्गिक तलावातील गाळ काढून सदरचा तलाव व तलाव परिसराचे सुशोभीकरण करणे. **(33)** महापालिका मुख्यालय इमारतीमध्ये येणाऱ्या सर्व सामान्य जनतेस, मनपा कर्मचाऱ्यांस आणि ठेकेदारांच्या कर्मचाऱ्यांना (विशेषत: महिला वर्गास) मुख्यालय स्थळी निर्माण झालेल्या आरोग्य विषयक समस्येचे निराकरण करण्यास तसेच मुख्यालय स्थळी कार्यालयीन वेळेत घडणाऱ्या संभाव्य अपघात, दुर्घटना विचारार्थ घेऊन मुख्यालयाच्या तळमजल्यावर प्राथमिक औषधोपचार करण्यासाठी सर्व सोईयुक्त अत्याधुनिक औषधोपचार केंद्राची तरतूद करणे **(34)** घणासोली विभागातील रस्ते आणि पदपथांची सिडकोने गेल्या 10 वर्षात देखभाल दुरुस्ती करण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे येथील रस्ते व पदपथांची दुरावस्था झाली आहे तसेच शहराचे नियोजन प्राधिकरण आणि पालकत्वाच्या अधिकारात व स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महापालिकेकडून या क्षेत्रातील जनतेकडून आजपर्यंत अंदाजे रुपये 500 कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल करण्यात आला आहे. त्यामुळे नमुंमपा महापालिकेने प्राधिकरणाच्या उत्तरदायीत्व जबाबदारी घणसोली विभागातील दुरावस्थेतील रस्ते पदपथांची तातडीने दुरुस्ती, देखभाल, पुर्नबांधणी करणेसह पुर्ननिर्मिती करण्याची कार्यपुर्तता करावी.

**35 ते 37. श्रीम. मेघाली मधुकर राऊत यांजकडून :-**

**(35)** प्र. क्र. 38 मध्ये असलेल्या शाळा क्र. 38 चा F.S.I. शिल्लक असल्यामुळे त्यावर दोन मजले वाढविणे व मुलांना सांस्कृतीक कार्यक्रम करणेसाठी एक हॉल ची व्यवस्था करणे. **(36)** प्र. क्र. 38 मध्ये असलेले मैदान लगत स्वच्छता गृहाची दुरुस्ती व मैदानात असलेले सभामंडप याची नुतनीकरण व्यवस्थीत करणे. **(37)** प्र. क्र. 38 मध्ये आतील रोडवर स्पीड ब्रेकर टाकणे.

**38 ते 40. श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-**

**(38)** प्र. क्र. 102 मधील पीपल्स स्कुल ते ओ.एन.जी.सी. कॉलनी पर्यंत पदपथांची दुरुस्ती करुन नागरीकांना सुसज्ज असे पदपथ बनविणे. **(39)** प्र. क्र. 102 मधील डॉ. आंबेडकर उदयान ते सेक्टर 2 पर्यंत पदपथाची दुरुस्ती करुन नागरीकांना सुसज्ज असे पदपथ बनविणे. **(40)** प्र. क्र. 102 मधील सेक्टर 9 विभागात नागरीकांना बसणेकरीता बाकडे बसविणे.

**41 व 42. सौ. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**

**(41)** मनपा प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांचे काम विचारार्थ घेऊन अत्यावश्यक सेवा सुविधांच्या संदर्भातील निविदा कामांतील कंत्राटी कामांतील पदांवरील कामगारांना समान काम समान वेतन या तत्वावर वेतन मेहनताना देण्यात येत असल्याने ती पदे व त्या पदांवरील व्यक्ती संपुर्णत: शासन सेवा सुविधांची लाभार्थी ठरत आहेत. त्यामुळे सदरच्या पदांवर नेमावयाची नियुक्त करावयाची व्यक्ती हि महाराष्ट्राची अधिवासी नागरीक असण्याचे बंधनकारक ठरवून त्यामध्ये शासनाने घोषीत केलेल्या राखीव वर्ग प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करणे. **(42)** मनपाचे निविदा तसेच मनपा मालमत्ता विषयक ठेकेदार, सेवा सल्लागार, लाभार्थी यांच्यासोबतचे करार दस्तऐवज हे मनपा प्राधिकरणाने घटीत केलेल्या विधी समिती आणि मनपा विधी विभागाच्या माध्यमातून तपासून त्यावर अभिप्राय, सुधारणा, सुचना घेण्याचे प्रत्येक मनपा विभागास बंधनकारक कार्यपध्दत सुरू करणे.

**43 ते 45. सौ. उषा पुरूषोतम भोईर, यांजकडून :-**

**(43)** वार्ड क्र. 56, कोपरीगाव येथील अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे. **(44)** वार्ड क्र. 56, कोपरीगाव येथील भूखंड क्र-16 शेजारी आदर्श शाळा बांधणे. **(45)** वार्ड क्र. 56, कोपरीगाव येथील भूखंड क्र-8 अ येथे उद्यानासाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर उद्यान विकसित करणे.

**46. श्री. लिलाधर गणपत नाईक, यांजकडून :-**

प्र. क्र. 50, कोपरखैरणे नोड बोनकोडे मधील कोळीवाडा, शिवाजीनगर, समता नगर, पाटील आळी, म्हात्रे आळी, नाईक आळी या परिसरातील पदपथावर पेव्हर ब्लॉक बसविणे.

**47 ते 49. श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**

**(47)** महापे-शिळफाटा रोड येथे नवी मुंबईची हदद संपते. तिथे नवी मुंबई महानगरपालिकेचा प्रवेशव्दार उभारणे.

**(48)** प्र. क्र. 26, मधील हनुमान नगर, शाळा क्र. 39 या शाळेच्या भिंती, खिडक्या आणि ग्रीलची अत्यंत दुरावस्था झाली आहे. तरी दुरूस्तीचे काम लवकरात लवकर करण्यात यावे व शाळेला रंगरंगोटी करणे. **(49)** प्र. क्र. 26, मधील हनुमान नगर येथिल सर्व गटारांची अत्यंत दुरावस्था झाली आहे.गटार उघडे असल्यामुळे नागरिक त्यामध्ये विविध प्रकारचा कचरा टकतात, त्यामुळे अत्यंत दुर्गंधी होते, सदर गटारे खुप जुनी आहेत व तुटलेल्या अवस्थेत आहेत. तरी तेथील गटारे नवीन चांगल्या दर्जाची व बंदिस्त गटारे बांधणे.

**50 ते 52. श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**

**(50)** प्र. क्र. 64, वाशी, सेक्टर-8 अंतर्गत सागर विहार लगत असलेला भाग कित्येक वर्षापासून दुर्लक्ष झालेला आहे व येथील मोडकळीस आलेले फूटपाथ, रस्ते, पाय-या व ग्रील नव्याने बांधून सुधारणा करण्यात यावे. तरी सेक्टर-8, अंतर्गत सागर विहार लगत असलेला भाग येथील नव्याने बांधून विकसित करणे. **(51)** प्र. क्र. 64, अंतर्गत, वाशी पोलिस स्टेशन ते जिम्मी टॉवर पर्यंत मुख्य गटारांची अवस्था दयनिय झालेली आहे. तरी नवीन गटारे व फूटपाथ बांधणे. **(52)** प्र. क्र. 64, वाशी, सेक्टर-6 अंतर्गत सेक्रेटहार्ड शाळालगतच्या मुख्य रस्त्याच्या बाजूला असणारा फूटपाथ ते J-ROW लगतचे गटार व फुटपाथ मोडकळीस आलेला आहे तरी ते नव्याने बांधणे.

**53 व 54. श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील:-**

**(53)** प्र. क्र. 79, सानपाडा, सेक्टर-8 शहीद बाबू गेनू मैदानात व्यासपीठ उभारणे व दोन छोटया खोल्या बांधण्यात याव्या, जेणे करुन तेथे सांस्कृतिक कार्यक्रम करता येईल. **(54)** वाढत्या मंगलसुत्र चोरीच्या घटना व महिलांची सुरक्षा त्यासाठी संपुर्ण प्रभागातील चौकामध्ये C.C.T.V. बसविणे.

**55 ते 57. श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून:-**

**(55)** प्र.क्र. 111, नेरुळ, सेक्टर-44ए पामबीच सर्वीस रोडला दररोज हजारो नागरीक संध्याकाळी वॉक साठी येत असतात तसेच काही जेष्ठ नागरीक रात्री नऊ वाजेपर्यंत तयाठिकाणी बसून आपला वेळ व्यतीत करतात. रात्री अंधारामुळे तेथे येणा-या नागरीकांची गैरसोय होत असल्यामुळे त्याठीकाणी हायमास्ट दिवे बसविणे **(56)** प्र .क्र. 111, नेरुळ, सेक्टर-44ए मधील नवी मुबई महानगरपालिकोच्या नवीन उदयानामध्ये संध्याकाळ नंतर अंधार झाल्यावर काही गर्दुले अंधाराचा फायदा घेऊन चरस, गांजा, सेवन करण्यासाठी तसेच काही तरुण दारु पिण्यासाठी उदयानामध्ये बसतात व सोबत आणलेला कचरा तेथेच पसरवूण जातात. शिवाय उदयानाच्या बाजूला राहणा-या रहिवाशांना त्या गोष्टीचा त्रास सहन करावा लागत असल्याकारणाने सदर च्या उदयानामध्ये चांगले विदयुत दिवे लावणे. **(57)** प्र.क्र. 111, नेरुळ, सेक्टर-44ए मधील प्लॉट क्र. 3बी गोठिस कॉर्नर या दुकाणसमोरील फुटपाथ खचल्यामुळे त्याठिकाणी खडडा निर्माण झालेला आहे त्याच्या आजूबाजू ची परीस्थिती देखील तसीच आहे. तरी त्याठिकाणी फुटपाथ पुर्ववत करुन नविन पेवर ब्लॉक बसविणे.

**58. श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून:-**

प्र. क्र. 29, घणसोली-2 मधील 'एफ' विभाग कार्यालय घणसोली या कार्यालयात नवी मुंबई महानगरपालिका हिन्दी शाळा क्र. 75 व 76 ई 1 ते 8 पर्यत व माध्यमिक शाळा क्र. 105 माध्यम हिन्दी व मराठी ई 9 ते 10 पर्यत तसेच बालवाडी व खेलवाडी असे घणसोली गावांतील एकूण 2062 (दोन हजार बासष्ट) विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. व येथे असलेली जागा उपुरी पडत आहे, सिडको नोड मध्ये या विद्यार्थीसाठी शाळेचे बांधकाम सुरु आहे. ते लवकरात लवकर पुर्ण करणे.

**59 ते 61. श्रीम. संगीता राजबली यादव, यांजकडून :-**

**(59)** प्र. क्र. 06, यादवनगर देवीधामनगर येथे गटार व पदपथ बनविणे. **(60)** प्र. क्र. 06, यादवनगर येथे मोठी पाईप लाईन (जलवाहिनी) टाकणे. **(61)** प्र. क्र. 06, यादवनगर जयभावनी नगर येथे गटार दुरुस्ती करणे.

**62. श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, यांजकडून :-**

प्र.क्र. 67, से. 21 ओ/2 मध्ये सांस्कृतिक भवन बनविणे.

**63 ते 65. श्री. काशिनाथ वामन पवार :-**

**(63)** प्र. क्र. 97, मधील नामफलकांची झालेली दुरावस्था सुधारणा करणे. **(64)** प्र. क्र. 97, से. 18 मधील कै. आनंद दिघे उद्यानामधील खेळणी खराब/गंजली आहेत त्या ठिकाणी लहान मुलांसाठी नवीन खेळणी बसविणे. **(65)** प्र. क्र. 97, मधील सेक्टर 24 साठी प्रवेश कमान बसविणे.

**66 ते 68. श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून:-**

**(66)** प्र. क्र. 92, दारावे गांव (गावदेवी माता चौक) ते त्रिमुर्ती टावर (मारुती म्हात्रे) यांच्या घरापर्यंतचा रस्ता अरुंद असल्याने वाहतुकीची नेहमीच कोंडी होत असते परिणामी प्रवाशांना व नागरिकांना त्रास होत आहे. म्हणून वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी 150 मिटर लांबीचा व 9 मिटर रुंदीचा रस्ता तयार करणे. **67)** प्र. क्र. 92, दारावे येथे कोरल क्रस्ट कॉ.ऑ.हौ. सोसायटी नेरुळ से-23 येथून दारावे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर गावाची व परिसराची शोभा वाढविण्यासाठी भव्य असे प्रवेशव्दार उभारणे. **68)** प्र. क्र. 92, दारावे येथील मलनि:स्सारण वाहिनी कमी व्यासाच्या असुन निकृष्ठ दर्जाच्या झालेल्या आहेत. त्यामुळे वारंवार सांडपाणी चैंबरमधून बाहेर येत आहे. परिणामी नागरिकांच्या जिवितेला धोका निर्माण होत आहे म्हणून दारावे गांव अंतर्गत मलनि:स्सारण वाहिनी मोठया व्यासाच्या टाकणे.

**69 ते 71. श्रीम. सिमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-**

**(69)** प्र. क्र. 31, घणसोली, मधील समर्थ नगर ते म्हशेश्वर नगर येथील नादुरुस्ती गटरे, पदपथ दुरुस्ती करणे. **(70)** प्र. क्र. 31, घणसोली मधील नवीन मलनि:स्सारण वाहिन्या मोठया आकाराच्या टाकणे व काही भागात अपुर्ण वाहिन्या आहेत ते पुर्ण टाकणे. **(71)** प्र. क्र. 31, घणसोली मध्ये समर्थ नगर ते म्हशेश्वर नगर पर्यंत नादुरुस्ती विजेचे पोल, दिवे बदलून काही ठिकाणी नवीन पोल टाकणे.

**72 व 73. श्री. घन:श्याम रतन मढवी, यांजकडून:-**

**(72)** नमुंमपा हददीतील गावठाण भागातील घरांना जी 200 मिटर परीघातील गरजेपोटी बांधलेली घरे ज्यांना शासनाने संरक्षीत केलेली आहेत. तसेच सनद, प्रॉपर्टी कार्ड असलेले

घरे यांना अनधिकृत शिक्का मारुन तिप्पट कर आकारणी केली जाते. तरी सदर घरांची योग्य तपासणी करुन कागदपत्रे पडताळून सर्व सामान्य कर आकारणी करण्यात यावी व अनधिकृत शिक्का हटविणे. **(73)** घणसोली गाव खाडीलगत CRZ-1 मध्ये सिडकोने कच्चा रस्ता जवळ जवळ दिड किलोमिटर अंतराचा बनवला असुन त्या ठिकाणी सुशोभिकरण करुन सदर रस्त्याचे जॉगींग ट्रॅक मध्ये रुपांतर करण्यात यावे व त्याठिकाणी जॉगर्स व जेष्ठ नागरीक पुरुष महिलांसाठी लाईट, शैचालय, पाणी, निवारा शेड इत्यादी सुविधा पुरवणे.

**74 ते 76. श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**

**(74)** प्र.क्र. 108 अंतर्गत सर्व रस्त्यांना नो पार्किंग झोन घोषीत करुन त्या संदर्भात सुचना फलक प्रत्येक रस्त्याच्या शेजारी उभारणे. **(75)** प्र.क्र. 108 अंतर्गत ज्येष्ठ नागरिक भवन असलेल्या रस्त्यांवर रितसर सशुल्क पार्किंग झोनची व्यवस्था करणे. **(76)** प्र.क्र. 108 येथील सेक्टर 48, साईबाबा मंदीर येथे कायमस्वरुपी वॉटर कुलर (पाणपोई) उभारणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 06 नोव्हेंबर 2015.**